तरुण भारत संवाद
गुरुवार, २३ नोव्हेंबर २०२३

# विशाल लाड यांना लष्कारात असिस्टंट गॅरिसन इंजिनियर पदावर पदोन्नती



कोल्हापूर : सरलष्कर पार्क, कोल्हापूर येथील विशाल लाड यांना भारतीय सैन्य दलामध्ये असिस्टंट गॅरिस इंजिनियर या पदावर पदोन्नती मिळाली आहे. लाड यांची स्टार सिलेक्शन कमिशनमार्फत मिलिटी इंजिनियरिंग सर्व्हिसेसमध्ये २०१४ साली ज्युनियर इंजिनियर या पदावर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, पुणे आणि नॅशनल डिफेन्स अकादमी, पुणे येथे सेवा बजावली. नुकतीच खात्यांतर्गत परिक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना असिस्टंट गॅरिसन इंजिनियर या पदावर पदोन्नती देणेत येऊन भोपाळ, मध्य प्रदेश येथे त्यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. विशाल हे कर्णबधीर असून त्यांचे प्राथमिक शिक्षण माईसाहेब बावडेकर, विद्यालय येथे तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे झाले. तसेच त्यांनी बी ई मेकॅनिकल ही पदवी प्राप्त केली असून अंपगत्वावर मात करुन विशाल यांनी जिद्द, एकाग्रत व चिकाटीच्या जोरावर मिळवलेले यश हे इतरांना आदर्शवत असेच आहे. केएमटीचे सेवानिवृत्त कनिष्ठ लिपिक विठ्ठल लाड यांचे विशाल चिरंजीव आहेत.

सकाळ

कोल्हापूर, गुरुवार, २३ नोव्हेंबर २०२३

# खेळाडूंनी खेळाकडे करिअर म्हणून पहावे : डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धा न्यू कॉलेज मैदानावर झाल्या. उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व संस्थेचे माजी चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी डॉ. शिर्के यांनी खेळाडूंनी खेळाकडे करिअर म्हणून पहावे. खेळातील स्पर्धेमुळे आयुष्याच्या स्पर्धेत टाकण्याचे धाडस निर्माण होत असल्याचे सांगितले.

डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. आर. व्ही. शेटगे उपस्थित होते.

स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद शिवराज महाविद्यालयाने, न्यू कॉलेजने द्वितीय, पुरुष विभागाची चॅम्पियनशिप नाईट कॉलेजने तर महिला विभागात विवेकानंद कॉलेजने विजेतेपद पटकावले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून प्रतीक पाटील व महिला खेळाडू म्हणून प्राजक्ता शिंदे यांना गौरवण्यात आले. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.स्वागत प्रा. अमर सासने यांनी केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. आर. डी. धमकले यांनी मानले.




कोल्हापूर : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अन्य मान्यवर.

सकाळ
कोल्हापूर
गुरुवार, २३ नोव्हेंबर २०२३

# परदेशी विद्यार्थ्यांची विद्यापीठाला पसंती

## यंदा संख्या दुप्पट : श्रीलंका, सिरीयासह १२ देशांतील विद्यार्थी


**संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी परदेशी विद्यार्थ्यांचा शिवाजी विद्यापीठाकडील कल वाढला आहे. यावर्षी श्रीलंका, बांग्लादेश, सिरीयासह विविध १२ देशांमधील एकूण २८ विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रवेश घेतला आहे. इंटरनॅशनल अफेअर्स सेलच्या प्रयत्नांमुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत ही संख्या दुप्पट झाली आहे. त्याने विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय पातळीवरील ओळख आणखी ठळक बनली आहे.

जगभरातील विविध देशांमधील विद्यापीठांसमवेत शिवाजी विद्यापीठाचे शिक्षण, संशोधनात परस्पर सहकार्य वाढावे याउद्देशाने याठिकाणी सन २०१६ मध्ये इंटरनॅशनल अफेअर्स सेलची स्थापना केली. याअंतर्गत परदेशांमधील विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी येथे प्रवेशित होऊ लागले. सुरुवातीला त्यांची संख्या अगदी कमी होती. गेल्यावर्षी १५ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. यंदा विविध देशांमध्ये आपल्या देशाच्या राजदूतांच्या माध्यमातून विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांची माहिती पोहोचविली. त्याचा चांगला परिणाम होऊन श्रीलंका, मॉरिशस, सिरीया, नेपाळ, बांगलादेश, पेरू, टांझानिया, दक्षिण आफ्रिका, तुवालु, फिजी, मलावी, लेसोथो या देशांतील एकूण २८ विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, पीएचडीसाठी प्रवेशित झाले आहेत. त्यात १८ मुली, तर १० मुले आहेत. यापैकी पदवी अभ्यासक्रमासाठी १८, पदव्युत्तर ७, तर पीएचडीचे ३ विद्यार्थी आहेत. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या (आयसीसीआर) माध्यमातून या विद्यार्थ्यांना प्रवेश, वसतिगृह शुल्क, दैनंदिन व प्रवास खर्चासाठी फेलोशिप मिळते. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था केली आहे. परदेशी विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झाल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाची कक्षा २१ देशांपर्यंत रूंदावली आहे. या देशांतील विद्यापीठांसमवेत संयुक्त पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यासह संशोधनासाठी परस्पर सहकार्य वाढविले जाणार आहे.



कोल्हापूर : श्रीलंका, बांग्लादेश, सिरीयासह विविध १२ देशांमधील एकूण २८ विद्यार्थ्यांनी यंदा शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेतला आहे.




### या अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशित

पर्यावरणशास्त्र, हिंदी, पर्यावरण, संगीत, एम. ए. मास कम्युनिकेशन, बायोकेमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन, एम. कॉम., बी. टेक कॉम्प्युटर सायन्स, मानसशास्त्र, सामाजिकशास्त्र, बी. ए. इंग्लिश, बीबीए या अभ्यासक्रमांना यंदा परदेशी विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. विद्यापीठातील अधिविभाग, राजाराम महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, महावीर महाविद्यालय, डीकेटीई इचलकरंजी, आरआयटी साखराळे, एसजीएम कराड महाविद्यालयातून ते शिक्षण घेत आहेत.

> जगभरातील विविध देशांमध्ये आपल्या देशाच्या राजदूतांच्या माध्यमातून अधिक चांगल्या पद्धतीने शिवाजी विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती पोहोचविण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम होऊन यावर्षी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झाली आहे. सध्या विद्यापीठात विविध २१ देशांतील एकूण ६६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांची संख्या आणखी वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
>
> **-डॉ. एस. बी. सादळे,** संचालक, इंटरनॅशनल अफेअर्स सेल

### 'एनआयआरएफ' रॅंकिंगला मदत होणार

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रॅंकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) मध्ये परदेशी विद्यार्थ्यांचा प्रवेश या निकषांमध्ये विद्यापीठाला कमी गुण मिळत होते. आता या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने रॅंकिंगमध्ये त्याची मदत होणार आहे.